नि. फौजदारी खटला क्र. **<u>१०५३/२०२३</u>**
सरकार विरूद्ध राजकुमार वामन
**निशाणी ३०**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,
माझे नाव : नितीन श्रीकृष्ण वानखडे
वय : २९ वर्षे,
धंदा : शेती,
राहणार : वणी वारूळा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

मी आरोपी राजकुमान वानखडे याला ओळखतो. तो माझे गावातील रहिवासी आहे. आरोपी न्यायालयासमक्ष आरोपीच्या पिंज—यात हजर आहे. मी फिर्यादी विनोद वानखडे यालादेखील ओळखतो. मला घटनेबाबत काहीच माहित नाही. घटना किती वाजता घडली व काय घडले हे मला माहित नाही. माझेसमक्ष कोणतीही घटना घडली नाही. असे घडले नाही की, आरोपी याने फिर्यादीच्या डोक्यावर दगड मारला होता. पोलीसांनी मला विचारपुस केली नाही व माझे बयान नोंदवले नव्हते.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली)***

२. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला विचारपुस करून माझे बयान नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०३/०८/२०२३ रोजी सायंकाळी ०८:०० वाजता वणी वारूळा बस स्टॅन्डवर माझेसमक्ष घटना घडली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला डोक्याला, पायाच्या मांडीवर व टोंगळ्याला दगड मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून तुला पाहुन घेईल अशी धमकी दिली होती. आता मला माझे बयानातील **अधारेखांकित भाग 'अ'** वाचुन दाखवला. त्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नाही. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. सदर मजकुर माझे बयानात नमुद असण्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ओळखतो.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपी स्वतः उपस्थित, आरोपीने स्वतः नाकारली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १४.१०.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.